अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर.
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, ०२ साधु वासवानी रोड,
कॅम्प, पुणे-४११००१
दुरध्वनी क्रंमाक :- ०२०-२६१२६९६२/ २६२०८२३१
ई-मेल - addlcpcrime.pune@nic.in

जा.क्र.अपोआ/गुन्हे/परि.पोउपआ/पो.स्टे.भेट/ ८२ /२०२५ दिनांक :- ०७/०२/२०२५

**विषय** :- परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे पोलीस स्टेशन भेटी बाबत...

**संदर्भ** :- मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडील मासिक गुन्हेविषयक बैठक नं.०१/२०२५ चे इतिवृत्त जा.क्र.पो.आ.वाचक/२१/२०२५, दि.१६/०१/२०२५.

...........

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दि.१३/०१/२०२५ रोजी आयोजित केलेल्या मासिक गुन्हे विषयक बैठकी दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामधील सर्व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी मंगळवार ते गुरुवार असे तीन दिवस आपआपले परिमंडळातील पोलीस स्टेशनला प्रत्येक भेट दयावी अशा सुचना दिलेल्या आहेत. त्याबाबत वरील संदर्भान्वये सर्वांना कळविण्यात आलेले आहे.

तरी पुढील आठवडयात आपण मंगळवार ते गुरुवार असे तीन दिवस खालील नमूद तक्त्याप्रमाणे पोलीस स्टेशनला भेट दयावयाची आहे.

| अ.नं. | परिमंडळ | वार, दिनांक व पोलीस स्टेशन | | |
|---|---|---|---|---|
| | | मंगळवार दि.११/०२/२०२५ | बुधवार दि.१२/०२/२०२५ | गुरुवार दि.१३/०२/२०२५ |
| १ | परिमंडळ-१ | फरासखाना | खडक | शिवाजीनगर |
| २ | परिमंडळ-२ | कोरेगाव पार्क | आंबेगाव | स्वारगेट |
| ३ | परिमंडळ-३ | कोथरुड | पर्वती | नांदेडसिटी |
| ४ | परिमंडळ-४ | बाणेर | खडकी | चंदनगर |
| ५ | परिमंडळ-५ | हडपसर | फुरसुंगी | काळेपडळ |

पोलीस स्टेशन भेटी दरम्यान यापूर्वी आपण करीत असलेल्या कार्यवाही व्यतिरिक्त भेटीवेळी तपास अधिकारी यांची दप्तर तपासणी घेवून त्यांचेकडे प्रलंबित असलेले गुन्हे व तक्रारी अर्ज निर्गती बाबत मार्गदर्शन करुन गुन्हे व अर्ज विनाकारण प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा दरबार घेण्यात यावा. पोलीस स्टेशनला येणा-या प्रशासनविषयक अडचणी व इतर आवश्यक कामकाजाबाबत पाहणी करावी.

तसेच इकडील कार्यालयाकडून वेळोवेळी दिलेल्या सुचना व आदेश याप्रमाणे पोलीस स्टेशनस्तरावर कार्यवाही करण्यात येते का याबाबत पाहणी करावी.

**(मा.पोलीस आयुक्त यांचे आदेशाने)**

**(शैलेश बलकवडे)**
**अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,**
**पुणे शहर.**

**प्रति,**

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, २, ३, ४, व ५, पुणे शहर

**प्रत सस्नेह**

अपर पोलीस आयुक्त, पूर्व व पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर.

**प्रत माहितीस्तव सादर**,

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर.
मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर.

प्रत,

प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, पुणे शहर.
२/- सदरचा आदेश पुणे पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईटवर अपलोड करावा.

प्रत,

पोलीस नोटीस प्रसिध्दीसाठी